
# KNOWLEDGE RESONANCE

ISSN : 2231-1629
A HALF YEARLY PEER REVIEWED REASERCH JOURNAL
(Evaluated in the SJIF Journal Masters List Evaluating Process with Impact Factor of 8.072 for Year 2021 )

A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal




Vol 10 No.2 July-Dec. 2021

Research Journal Publication Committee
Dr. M. K. Umathe College, Nagpur

A HALF YEARLY PEER REVIEWED REASERCH JOURNAL
KNOWLEDGE RESONANCE
Vol 10 No.2 July-Dec. 2021

Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

39. निरीक्षणांचे निरीक्षण
श्रीमती मंदा प्रकाश उमाठे* डॉ. सरिता देशपांडे** 139
40. बेकारी सामाजिक समस्याः एक समाजशास्त्रीय अध्यन
प्रा. डॉ. राजेंद्र यादवराव बारसागडे 142
41. कीर्तन परंपरेतील स्त्री अभिव्यक्ती
डॉ. अनघा तेंडुलकर 145
42. भारतातील ग्रीन बँकिंग
प्रा. डॉ. सुरेश चंद्रकांत मेहेत्रे*, प्रा. डॉ. श्रद्धानंद बाबासाहेब माने** 149
43. वर्तमान कालीन समस्यांच्या संदर्भात ज्ञानेश्वरीतील अभयमिमांसा
ले.– गणेश मुरलीधर बडे 152
44. वेठबिगारी– एक सामाजिक समस्या
बंडू पाटेकर 158
45. भारतीय सार्वजनिक उपक्रमांची विकासाचा प्रादेशिक असमतोल कमी करण्यातील भूमिका
डॉ. बाळासाहेब निर्मळ 161
46. पर्यावरण समस्या आणि सुरक्षा
डॉ. आर. जी. टाले 164
47. व्यंकटेश माडगूळकर यांची 'सत्तान्तर': एक पुनरावलोकन
प्रा. शैलेश औटी 168
48. आदिवासी आर्थिक समस्या आणि विकास: चिकित्सक अध्ययन
भाग्यश्री स. होले 174
49. आदिवासींचे संघर्षमय जीवन
डॉ. सोमा पी. गोंडाणे 177
50. भारतीय संविधानात आदिवासींकरिता असलेल्या विविध तरतुदी
डॉ.विद्या नामदेवराव खंडारे 181
51. संत नामदेवांच्या अभंगरचनेतील कृषिविषयक जाणिवा
प्रा. डॉ.ज्ञानबा महादू गाडे 186
52. आदिवासी साहित्य प्रवाहातील कविता व सद्य:स्थिती
डॉ. शिवराज काचे 188
53. सत्याचे प्रयोग आत्मचरित्र आणि गांधींना झालेली स्वः जाणिव
संजय जनार्धन आगलावे 193
54. विधवा महिलांच्या समस्या व समाजसुधारकांची कार्य
डॉ. पोपळघट राजू शेषराव 196
55. पर्यावरण आणि मानवी हस्तक्षेप
श्री. दत्तराव पंतू पवार 199
56. एका तेजस्विनीची चित्तरकथा: मास्तरांची सावली
डॉ.लक्ष्मण ना. वाघमारे 202
57. स्त्री मुक्ती चळवळतील राजश्री शाहू महाराज यांचे योगदान
देशमुख प्रतीक्षा ब्रह्मदेव 205
58. भविष्यातील भारत आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार
डॉ. सागर लोकनाथ बडगे 207
59. Exploring Anita Desai's Fasting, Feasting with feminist view
Swapnil R. Dahat 211



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
July – December 2021- Vol. 10 No. 2

# वेठबिगारी- एक सामाजिक समस्या

**बंडू पाटेकर**
*सहायक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग*
*शासकीय कला व विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद*

**प्रस्तावना-**

पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील काळू पवार (४८) या मजुराला त्याच्या मुलाच्या कफन खरेदीकरिता त्याच्या मालकाने ५०० रुपये उसने दिले होते. हि रक्कम वसूल करण्याकरिता काळू हा मालकाकडे वेठबिगारी करत होता. त्या पिळवणुकीला कंटाळून अखेर त्याने आत्महत्या केली.त्याच्या पत्नीने याबाबत अखेर तक्रार दिल्यावर आणि श्रमजीवी संघटनेने हा विषय लावून धरल्यावर अखेर गुन्हा दाखल झाला.जिल्हा प्रशासन व पोलिसांनी हे प्रकरण वेठबिगारीचे नाहीच असा पवित्र घेतला होता.या प्रकरणाची धग जाणवत असतानाच उद्योगनगरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या भिवंडी तालुक्यातील पिळझे गावातील १० आदिवासी मजुरांची वेठबिगारीतून मुक्तता केली गेली.राजाराम काथोड पाटील आणि चंद्रकांत काथोड पाटील या दोघांनी त्यांच्या वीट भट्ट्या,खदानी,शेतात अत्यल्प मोबदल्यावर या आदिवासींची गेली ३५ वर्ष पिळवणुक सुरु ठेवली होती.कामावर खाडा केल्यास मजुरी तर कापली जाणारच,शिवाय वर बेदम मार मिळत होता.आदिवासी महिला,अल्पवयीन मुली यांना मालक अंगाला मालिश करण्याकरिता बोलावून घेत असे.एका महिलेने बलाकाराचा गुन्हा दाखल केला आहे.एका मुलीने विनयभंगाचाही गुन्हा दाखल केला आहे.अत्यंत क्लेशदायक व भीषण असे हे वास्तव आहे. आधुनिक पुरोगामी वगरे मुंबईपासून जेमतेम ४० ते ४५ किमी अंतरावर आठवड्याला नवरा बायकोला केवळ ५०० रुपये मजुरी देऊन १८ तास वीट भट्टीवर राबवले जाते.स्त्रियांची व मुलीची अब्रू लुटली जाते:मुंबईतील चकचकीत जगाला आपल्या चमचमाटात पलीकडचे काही दिसत नाही.गेली ३५ वर्ष हे घडतेय त्या विश्वाला मुंबई ठाण्यात वातावरणात किती मोकळेपणा आहे,याची गंधवार्ताही नाही.इंडिया-भारत कसे एकमेकांना खेटून बसले आहेत,याचेच हे अत्यंत विदारक वास्तव आहे.दोन अत्यंत परस्परभिन्न प्रतलावर जगणाऱ्या मधील ही दरी जेवढी वाढत जाईल तेवढे धोकादायक आहे.

वेठबिगारीची हि दोन्ही प्रकरणे उघडकीस आणणारे श्रमजीवी संघटनेचे विवेक पंडित म्हणतात की वेठबिगारी संपुष्टात आली असे आम्हीदेखील समजत होतो.परंतु भिवंडीत ती पूर्वीच्या पद्धतीनेच सुरु होती.पालघर प्रकरणात प्रशासनाने वेठबिगारीचे हे प्रकरणच नाही अशी भूमिका घेतली होती. मात्र तेथे आम्ही पूर्ण ताकद लावून संघर्ष केल्याने भिवंडीतील प्रकरण उघडकीस येताच पोलीस व जिल्हा प्रशासनाने तात्काळ कारवाई केली. एकेकाळी वेठबिगारी ही केवळ शेतीत होती.गेल्या काही वर्षात ती वीटभट्टी,दगडाच्या खाणी वगरेतही सुरु झाली.मजुरांना आघाऊ रक्कम मोजून आपल्याशी बांधून ठेवायाचे ही नवी पद्धत आहे.किमान वेतन कायद्यानुसार मजुरांना ४५० रुपये किमान रोज दिला पाहिजे.भिवंडीत पती पत्नीला मिळून आठवडयाचे ५०० रुपये दिले जात होते.खाडा केले तर २०० रुपये कापून घेतले जात होते.वीटभट्टी वर काम केल्याचे ८०० रुपये रोज दिला पाहिजे.मोखाडा असो की भिवंडी येथे उत्तर प्रदेश,बिहार, झारखंड,ओरिसा येथून मोठ्या प्रमाणावर गरीब येतात. ते अत्यल्प रकमेत मजुरी करतात. साहजिकच ठेकेदार,वीटभट्टी मालक त्यांच्या गरिबीचा गैरफायदा घेतात.

सावकार व वेठबिगारी हे परस्परपूरक आहेत.मुंबईसारख्या शहरातही सावकारी चालते.सफाई कामगार व तत्सम मजुरी करणाऱ्याना बँका छोट्या गरजांकरिता पैसे देत नाहीत.त्यामुळे ते सावकारी कर्ज घेतात.काही कामगार संघटनाचे पदाधिकारी हेही सावकारी कर्ज देतात.असे धक्कादायक प्रकार उघड झाले आहेत.त्यामुळे मुंबई, ठाणे,मीरा भाईंदर यासरख्या शहरांमध्ये सफाई कामगार व तत्सम मजुरांची एटीम कार्डही सावकारांकडे गहान पडलेले असतात.पगार बँक खात्यात जमा झाल्यावर सावकार अगोदर पैसे काढून घेतो.मग हात खर्च करिता कामगाराला देतो. कोरोनामुळे औद्योगिक क्षेत्रातील कामगारावर बेकारीची,आर्थिक संकटाची परिस्तिथी ओढवली आहे.असंघटीत क्षेत्रातील मजुराबरोबरच हा कामगारही काही प्रमाणात सावकारी पाशात ओढला गेला आहे.ग्रामीण भागात तर सातवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर काही शिक्षकांनी सावकारी सुरु केल्याच्या तक्रारी आहेत.ग्रामीण भागातील काही शिक्षक आपल्या जागी शिकवायला नाममात्र रकमेवर कुणाला तरी पाठवतो व स्वतः छोटी मोठी ठेकेदारी करतो. अशा ठेकेदार शिक्षकांनी सावकारी करून दिलेल्या पैशाच्या वसुली करिता वेठबिगारी सुरु केल्याचीही उदाहरणे आहेत.

रायगड जिल्ह्यातील आदिवासींच्या हक्काकरिता लढा देणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन सांगतात,कोकणातील सर्व जिल्ह्यात वेठबिगारी सर्रास सुरु आहेत.शेतीचा हंगाम संपला की मजूर पुरवणारे ठेकेदार आगाऊ रक्कम देऊन



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July – December 2021- Vol. 10 No. 2

आदिवासींना बांधून घेतात.महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश वगैरे राज्यातील वीट भट्ट्या,कोळसा खाणी, बांधकाम यांवर काम करण्याकरिता मजूर नेले जातात. अशाच पद्धतीने उत्तर महाराष्ट्र व विदर्भातूनही आदिवासी मजूर परराज्यात नेले जातात.केवळ दोन ते पाच हजार रुपये देऊन सहा – सात महिने त्यांच्याकडून अहोरात्र काम करून घेतले जाते.लग्न,घरबांधणी याकरिता या मजुरांनी घेतला असेल,तर त्याचा हिशोब या कामगारांकडे नसतो.त्यामुळे पिळवणूक सुरु राहते.कोळशाची पोती,वीटभट्टीवर हजारी विटा,असा हिशोब असतो.विटा तयार करताना ११०० विटा तयार केल्यावर एक हजार विटा तयार केल्याचे मुकादम मान्य करतो.शंभर विटा या तुटक्या फुटक्या समजून हिशोबात धरल्या जात नाहीत.अन्य कुठल्याही धंद्यात नुकसानीची जबाबदारी ही भांडवलदाराची असते.मात्र,वेठबिगारीत ही सर्व जबाबदारी मजुराच्या माथी मारली जाते. बिहारमधल्या मुझफ्फरपूर जिल्ह्यातला २० वर्षाचा नसीम अहमद एका दलालामार्फत राजस्थानतल्या संगमरवरासाठी (मार्बल) प्रसिद्ध असलेल्या किशनगढ मधल्या एका कारखान्यात कामाला लागला. दिवसाला ८० रुपये मजुरी आणि एक पैसाही न घेता, कारखान्याच्या आवारात राहण्याची व्यवस्था होणार म्हणून खुशही झाला.पण कालांतराने त्याचा हे लक्षात येऊ लागलं,की गावाकडे काम नव्हते,पण किमान मोकळा श्वास तरी घेता येत होता.किशनगढला आल्यानंतर कारखान्यापलीकडे आयुष्यच उरले नाही.दिवसाला १४ तास काम करायचे.काम संपले की कारखान्याच्या आवारातच असलेल्या पत्र्याच्याछोट्याश्या खोलीत परतायचं.खोलीत एक बल्ब सोडला,तर कोणतीच सुविधा नाही. शौचालय सार्वजनिक अंघोळी हातपंपाजवळ उघड्यावरच करायच्या.तिथलाच पाणी प्यायला वापरायचे.छोट्या खोलीतच, तिथेच इतरांसोबत आळीपाळीने स्वयंपाक करायचा. तिथेच जागा करून झोपी जायचे.दिवसभर संगमरवराच्या कटाईमुळे उडणाऱ्या अश्या धुळीत काम करायचे.वजनदार दगड उचलायचे. अजस्त्र यंत्रात सरकायचे.याचा नसिमला सुरवातीला खूप त्रास झाला. पण आजारपणामुळे निक्कमे ठरलेल्या कामगारांना मालकाने कामावरून काढून टाकल्याचे, कितीतरी सहकारी कामगारांना अजस्त्र यंत्रामध्ये हाथ अडकून अपघात झाल्याचे त्याने स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले. सुदैवाने त्याला आजपर्यंत अपघात झालेला नाही,पण कदाचित आपलीही तीच अवस्था होईल आणि आपल्याला असहाय अवस्थेत गावाकडे पाठवून दिले जाईल, ही भीती त्याचा पिच्छा सोडत नव्हती. किशनगढ मधल्या एक हजाराहून अधिक मार्बल कारखाण्यामधून नासिमसारखे जवळपास १२ हजार कामगार काम करताहेत.त्यांचीही अवस्था थोड्याफार फरकाने नसिम सारखीच आहे. रोज जवळपास ४०० ट्रक भरून वेगवेगळ्या आकाराचा मार्बल इथून संबध देशभरात पाठवला जातो. इथे मालकांची किशनगढ मार्बल असोसिएशन आहे. पण कामगारांची एकही संघटना नाही. किंबहुना,मालक अशी संघटना उभीच राहू देत नाहीत. कारखान्यात मालकांच्या हजेरीत बोलता येणार नाही,म्हणून एका चहाच्या टपरीवर आठ-दहा कामगार भेटले.भेटायला आलेले सगळे कामगार बिहारच्या दरभंगा, सीतामढी, चपरा, आदी जिल्ह्यातून स्थलांतरित झालेले.म्हणाले,गाव मे रोजगार नही है .शहर मे मलिक खून चुस्ता है ..' आजारी पडलं तर काय करता?यावर नसीम म्हणाला, छोटी – मोटी बिमारी है,तो मालिक पैसा देता है ,मगर तनख्वाहसे काट भी लेता है .. कोई अगर ज्यादा बिमार पड जाए,हादसे मे हाथ कट जाए,ती पाच-दस हजार रुपया देकर उसको नौकरी से निकाल भी देता है ..गए दस साल मे हर महिने,यहा कमसे कम ऐसे तीन चार हादसे हुए है '.मग तुम्ही याविरोधात आवाज का उठवत नाही? "कौन उठाएगा?"हम यहा किसी के खिलाफ जायेंगे,तो गांव मे हमारा परिवार भूखा मर जाएगा..'' किशनगढ प्रमाणेच मुंबईतल्या धारावीच्या झोपडपट्टीमधून एकच वेळी हजारो तरुण जरीकाम करत असतात...कारीगर शिकाऊ असेल,तर त्याला पन्नास रुपये आणि अनुभवी असेल तर १२० ते १५० रुपये रोज इथे दिला जातो. ज्या कुबट –कोंदट खोलीत राहायचे,तिथेच दिवसाचे १४-१४ तास जरीकाम करायचे.कुठे बाहेर जाणे नाही की कोणाला भेटणे नाही.मालकांची त्यांच्यावर इतकी दहशत असते की परक्या माणसासमोर ते अभावानेच तोंड उघडतात. स्थलांतरीत म्हणून जगताना तुम्हाला कोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागते? असा प्रश्न विचारल्यावर ते गप्प राहतात.त्यात एखादाच राहतो तो स्वतःबरोबर इतरांचीही व्यथा बोलून जातो.गावसे मजबूर होकार बाहर निकलते है.. शहर मे आकार मलिक का डर सताता है साल मै एकबार जाब घर वापस जाते है ,तब सफर के दौरान सीट के पैसे लेकर भी रेल्वे पुलीस,सी.आर.पी.एफ. के जवान दंडे बरसते है ...घर जब पहुंचते है, तब शरीरपर जखम के निशान पडे होते है...सब जगह पिटते रहते है हम .' कंत्राटदार किंवा मालकाचा कामाशी मतलब असतो. शासन –प्रशासन तर खूप दूरची गोष्ट असते. एरवी, कुठल्यातरी कंत्राटदाराच्या मेहेरबाणीवर गवंडीकामापासून सुतारकामापर्यंत आणि भाजीचा ठेला चालवण्यापासून इस्त्री करण्यापर्यंतची कामे मिळवायची. १२ -१२ तास वाट्टेल ते काम करण्याची तयारी ठेवायची.त्यातही पुन्हा सातत्य नाही. नाक्यावर सकाळी उभं राहूनही काम नाही मिळालं, तर महिन्याचे आठ –दहा दिवस घरीच बसून काढायचे. महिन्याला कसेबसे पैसे पदरात पडले, की त्यातली ७५ टक्के रक्कम मनी ऑर्डर



Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aur...

किंवा डिमांड ड्राफ्टने नियमित पाठवून यायची ...रोजगाराची शाश्वती नाही. मिळालेला रोजगार टिकावा यासाठी कामगारविषयक कायद्याचे पाठबळ नाही, नोकरदाराला मिळणार भविष्य निर्वाह निधी किंवा वैद्यकीय विम्याचे संरक्षण नाही. आज उत्तर प्रदेश आणि बिहारहून आलेले लाखो युवक छोटय मोठ्या झोपड पट्ट्या आणि चाळीमधून स्वतः च्या जबाबदारीवर आयुष्य जगताना दिसतात. आपल्या हिमतीवर यायचं,हिमंत असेल तर जगायचं,हेच जणू ते स्वतः ला पुनः पुन्हा बजावत असतात.अगदी काळ परवापर्यंत स्थलांतराचा ज्ञात मार्ग उत्तर-प्रदेश ते मुंबई – कोलकाता-दिल्ली असाच होता.पण आता खेडं उत्तर प्रदेशातलं असो बिहारमधले असो,राजस्थान-महाराष्ट्र असो किंवा अगदी मणिपूर मधलं, खेड्यातलं जीवन दिवसेंदिवस अधिकाधिक त्रासदायक होऊ लागला आहे. परिणामी उत्तर-प्रदेश बिहारमधला खेड्यामधून बाहेर पडलेला बेरोजगार तरुण पारंपारिक रोजगाराची केंद्र सोडून बंगलोरमध्ये कणीस विकताना आपल्याला दिसतो.आणि केरळात पानाचे दुकान चालवतानाही आढळतो.पश्चिम बंगालमध्ये बेरोजगार एकगठ्ठा मुंबई गुजरातमधल्या बंद घरांमधून सोन्या चांदीचे कारागीर म्हणून राबताना दिसतात.

वास्तविक पाहता,गोव्यात,फार तर शेजारच्या महाराष्ट्र-कर्नाटकातला स्थलांतरीत दिसायला हवा, पण आपण ज्या गाडीने गोव्यातील पर्यटनस्थळ बघत असतो, त्या गाडीचा ड्रायवर हा मुळचा ओरिसातल्या खेड्यातला असतो. दापोलीसारख्या अस्सल कोकणातल्या गावात गेल्यानंतर सगळीकडे मराठीच माणसे असणार,हे आपण गृहीतच धरलेलं असते,पण रस्ता चुकल्यानंतर आपण ज्याला इच्छित स्थळी जाण्यासाठीचा पत्ता विचारलेला असतो. तो गवंडी काम करणारा तरुण बिहारमधल्या छोट्याश्या खेड्यातून आलेला असतो.खेड्यात राहणारा भारत हा असा सदासर्वकाळ इकडून –तिकडे, देशाच्या या टोकाकडून–त्या टोकाकडे, सतत स्थलांतर करत असतो.झोपडपट्ट्या मधून वस्ती करून असतो.

भांडवलशाहीने चतुराईने लादलेल्या या नवयुगीन गुलामीत जखडले गेलेले लोक तुम्हाला महानगरांमधल्या. विशेषतः असंघटीत क्षेत्रामधल्या उद्योगांमध्ये अधिक प्रमाणामध्ये दिसतात. या घटकेला भारतातला तब्बल ८० ते ९०टक्के कामगार-मजूर हा असंगटीत क्षेत्रात मोडतो. त्यातले ७० टक्के स्थलांतरित खेड्यातून आलेले असतात. हेच क्षेत्र कोणताही कायदेशीर संरक्षण नसतानाही देशाचे अर्थचक्र गतिमान ठेवण्यास मोलाची मदत करीत असते. ढोबळमानाने सांगायचे तर,यातले ३६ टक्के स्थलांतरित बांधकाम आणि पायाभूत सुविधाच्या रोजगार मिळवतात. २०.४ टक्के क्षेत्रात स्थलांतरित शेती आणि शेतीशी संबधीत प्रक्रिया उद्योगात काम करतात,तर जवळपास १६ टक्के स्थलांतरित उत्पादन क्षेत्रात काम करतात. “एन एसओ” च्या आकडेवारीनुसार त्यांच्या अर्थव्यव्स्थेतला वाट सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ टक्के इतका भरतो. सरकारी आकडेवारी असेही सांगते की सध्याची राज्यांतर्गत स्थलंतरितांची संख्या ३० कोटीच्या आसपास आहे, २०३० पर्यंत हा आकडा दुपटीने वाढून ही संख्या ६० कोटीच्या आसपास जाणार आहे. हे जे काही कोट्यावधी स्थलांतरित या राज्यातून त्या राज्यात स्थलांतर करत असतात, त्यात सरकारी आकडा खरा मानायचा,तर ६ कोटी २० लाख दलित वर्गातून ३ कोटीहून अधिक स्थलांतरित आदिवासी जमातीतले आहेत. यातल्या आत्मसन्मानाची जाणीव असलेल्या असंख्य लोकांनी जातीमुळे होत असलेल्या जाचापासून सुटका करून घेण्यासाठी स्थलांतर केलेले आहे.

यु.पी.बिहारमधल्या खेड्यात तुम्ही गेलात,तर जन्मापासून मरणापर्यंत दलित आणि मुसरसारख्या महादलित जातीताल्याना आजही अस्पृश्य समजून वागणूक दिली जाते.म्हणजे,अजूनही सवर्ण स्वतःला राजा मानतात आणि दलितांना प्रजा मानतात.त्यांच्याशी सार्वजनिक पातळीवर व्यवहार होत असले तरीही,वैयक्तिक स्तरावर मात्र,दलितांची जेवणाखानाची भांड्र मात्र वेगळी ठेवण्याची प्रथा आजही पाळली जाते. मात्र, हेच दलित किंवा मुस्लीम महानगरांमध्ये रोजगारासाठी येतात,तेव्हा काही जातीपातीच्या भिंती गळून पडतातच,परंतु मेहनत आणि कौशल्याच्या बळावर स्वतःचे उद्योग- धंदे उभारलेल्या दलित–मुस्लीम मालकांकडे गावाकडून स्थलांतर केलेले. ठाकूर-ब्राह्मण नोकरीस लागलेले आपल्याला पाहायला मिळतात.म्हणजेच,आत्मसन्मानाच्या जाणीवेने असंख्य दलित स्थलांतराचा मार्ग निवडतात,आणि स्थलांतराची हीच प्रक्रिया सवर्णामधल्या जात श्रेष्टत्वाच्याभावनेलाही काही काळापुरती का होईना तिलांजली देण्यास भाग पाडते. तेव्हा, यातनादायी असलेल्या स्थलांतराच्या प्रक्रियाचा जातीभेद दूर करण्यातला वाटा नजरेत भरल्यावाचून राहत नाही. दलितांसाठी स्थलांतर हा बंधनमुक्तीचाएक मार्ग असल्याचे दया पवारांचे बलुतं,नरेंद्र जाधवांचं इंग्लिश भाषेतलं अनटचेबल्स ही पुस्तक ठळकपणाने दर्शवतात, असं मत चिन्मय तुंबेसारखे अभ्यासकही यासंदर्भात आवर्जून नोंदवतात.

**संदर्भः-**


१. *दैनिक लोकमत-दि.३१/०८/२०२१*
२. *शेखर देशमुख उपरे विश्व, वेध मानवी स्थलांतराचा – मनोविकास प्रकाशन*




Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad